लोकमत

# दिवाळीनंतर होणार शिवाजी विद्यापीठाच्या १३० परीक्षा

## वेळापत्रकात बदल : आजपासून पहिले सत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : महापूर आणि ज्या अभ्यासक्रमांची उशिरा प्रवेश प्रक्रिया झाली आहे, अशा विविध १३० परीक्षा दिवाळीनंतर घेण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने घेतला आहे. त्यानुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळाने वेळापत्रकात बदल केला आहे. सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. एम. ए. (भाषा), संस्कृत, ऊर्दू या अभ्यासक्रमांच्या परीक्षा आज, मंगळवारपासून सुरु होणार आहेत.

विद्यापीठातर्फे पहिल्या सत्रात (हिवाळी) कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेच्या विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सुमारे सहाशे परीक्षा होणार आहेत. कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांतील सुमारे अडीच लाख विद्यार्थी-विद्यार्थिनी परीक्षा देणार आहेत. या परीक्षांची सुरुवात मंगळवारपासून होणार आहे. बी.ए., बी.एस्सी., बीबीए, आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा बुधवार (दि. १६) पासून होईल. सकाळी आणि दुपारी या सत्रांमध्ये परीक्षा होतील. डिसेंबरमध्ये शेवटच्या टप्प्यात एमबीए, अभियांत्रिकी, फार्मसी आणि नव्याने सुरु झालेल्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत. या पहिल्या सत्रात विविध परीक्षांच्या पाच हजार प्रश्नपत्रिका या 'एसआरपीडी' प्रणालीद्वारे परीक्षा केंद्रांवर पाठविण्यात येणार आहेत. दरम्यान, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांमध्ये परीक्षांची तयारी सोमवारी सुरु होती.



### विद्यार्थ्यांनी खात्री करावी

पहिल्या सत्रातील परीक्षांची तयारी पूर्ण झाली आहे. महापूर आणि ज्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया उशिरा सुरु झाली आहे. अशा अभ्यासक्रमांच्या १३० परीक्षा दिवाळीनंतर घेण्यात येणार आहेत. पूर्वनियोजनानुसार या परीक्षा १५ ऑक्टोबरपासून होणार होत्या. सुधारित वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. विद्यार्थ्यांनी या बदलेले वेळापत्रक पाहून आपल्या परीक्षांची माहिती घ्यावी, खात्री करावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. जी. आर. पळसे यांनी सोमवारी केले.



नवी दिल्ली येथे झालेल्या विश्व हिंदी संमेलनात डॉ. अर्जुन चव्हाण यांना 'हिंदी सेवा सन्मान' पुरस्कार प्रदान करताना केंद्रीय राज्यमंत्री व्ही.के. सिंह. सोबत डावीकडून डॉ. माला मिश्र, डॉ. विपिन कुमार, रश्मी सिंह आदी.

# डॉ. चव्हाण यांना 'हिंदी सेवा सन्मान'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण यांना दिल्लीत झालेल्या आंतरराष्ट्रीय हिंदी संमेलनामध्ये केंद्रीय राज्यमंत्री व्ही. के. सिंह यांच्या हस्ते 'हिंदी सेवा सन्मान' पुरस्कार प्रदान करण्यात आला. विश्व हिंदी परिषदेचे महासचिव डॉ. विपिन कुमार, संयोजक प्रा. डॉ. माला मिश्र, राजभाषा विभाग आणि दिल्ली महानगरपालिकेच्या आयुक्त रश्मी सिंह आदी उपस्थित होते.

महात्मा गांधीजींच्या १५०व्या जयंतीच्या निमित्ताने विश्व हिंदी परिषद व सरकारच्या राजभाषा विभागाच्यावतीने नवी दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय हिंदी संमेलन झाले. संमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध हिंदी लेखिका व गोव्याच्या राज्यपाल मृदुला सिन्हा यांच्या हस्ते झाले. संमेलनात हिंदी साहित्यात केलेले भरीव लेखन व हिंदीच्या प्रचार-प्रसारासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल विविध देशांसह भारतातील निवडक हिंदी साहित्यिकांचा हिंदी सेवा सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. त्यात डॉ. चव्हाण यांचा समावेश होता. डॉ. चव्हाण यांना संमेलनात 'गांधी और राष्ट्रभाषा हिंदी' या विषयाचे विवेचन करण्यासाठी 'विशेष अतिथी' म्हणून निमंत्रित केले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2019

पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठात वन्यजीव सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी.

# मानव, पर्यावरणाचे परस्परावलंबन समजून घ्या

## डॉ. जयदीप बागी; विद्यापीठात वन्यजीव सप्ताह

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वन, वन्यजीव आणि परिसंस्थेचे आधुनिक जगात असलेले महत्त्व मानव व पर्यावरणाचे असलेले परस्परावलंबन समजून घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. जयदीप बागी यांनी केले.

वन्यजीव संवर्धनासाठी नागरिकांमध्ये जागृती करण्याच्या उद्देशाने वन व वन्यजीव विभाग आणि तंत्रज्ञान अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सप्ताहाचे उद्घाटन उपवनसंरक्षक हणमंत धुमाळ यांच्या हस्ते झाले.

यावेळी मानद वन्यजीव रक्षक रमण कुलकर्णी यांचे 'जैवविविधता' विषयावरव्याख्यानझाले. सप्ताहामध्ये स्वच्छता अभियान, वन्यजीव विषयी व्याख्यानमाला, चित्रकला, रांगोळी असे विविध कार्यक्रम घेण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2019
पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षांना आजपासून प्रारंभ

## अडीच लाख विद्यार्थी; ६०० परीक्षांचा समावेश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षांना १५ ऑक्टोबरपासून प्रारंभ होणार आहे. परीक्षा विभागाकडून तयारी पूर्ण झाली असून विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे अडीच लाख विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

परीक्षा विभागाच्या वतीने हिवाळी सत्र परीक्षांचे नियोजन पूर्ण झाले आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयात १५ रोजी बी.ए., बी.एस्सी., व एम.ए.(भाषा) विषयाच्या परीक्षा सुरू होणार आहेत.

परीक्षेच्या पाच हजार प्रश्नपत्रिका 'एसआरपीडी' मोडद्वारे ऑनलाईन पद्धतीने पाठविण्यात येणार आहेत. बी.ए. सत्र-१ ते ४ च्या प्रश्नपत्रिका छापील स्वरूपात महाविद्यालयांना पाठविण्यात आल्या आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी दिली.


शिवाजी विद्यापीठातून...

शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने हिवाळी सत्र परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले होते. मात्र, पूरपरिस्थितीमुळे विद्यार्थांचे प्रवेश उशिरा झाले. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासही विलंब झाला. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार एम.एस्सी., सामाजिकशास्त्रे, भाषा विषयाच्या १३० पेक्षा जास्त परीक्षा दिवाळीनंतर ठेवण्याचा निर्णय झाल्याची माहिती प्रभारी परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालकांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2019
तरुण भारत

# न्यू कॉलेजमध्ये डी. बी. पाटील वक्तृत्व स्पर्धेत हर्षद औटी प्रथम

प्रतिनिधी
कोल्हापूर

न्यू कॉलेज आणि शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील सांस्कृतिक समितीच्या वतीने आयोजित डी. बी. पाटील राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत औरंगाबाद येथील मातोश्री कांचनलाल देसरडा महाविद्यालयाच्या हर्षद औटी याने प्रथम क्रमांक पटकावला. पुण्यातील मॉडर्न कॉलेजच्या तेजस पाटीलने व्दितीय, कोल्हापूरच्या प्रणाली मगदूमने तृतीय आणि कागलमधील डी. आर. माने महाविद्यालयातील शर्मिला पाटील व कमला कॉलेजच्या ऋतुजा पाटीलने उत्तेजनार्थ क्रमांक मिळवला. यशस्वी विद्यार्थ्यांना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पारितोषिक देवून गौरवण्यात आले.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, युवा पिढीने मोबाईलच्या आहारी न जाता योग्य वापर करून स्वत:च्या विचारांच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत. परीक्षकांच्या वतीने शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे संचालक विनय पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. अविनाश पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. डॉ. सर्जेराव शेटके, उमा गायकवाड यांनी सुत्रसंचालन केले. डॉ. कविता गगराणी यांनी आभार मानले.यावेळी संस्थेचे संचालक, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



कोल्हापूर : वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांसोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. सोबत संचालक विनय पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्रा. अविनाश पाटील, डॉ. सर्जेराव शेटके, उमा गायकवाड, डॉ. अलोक जत्राटकर आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 OCT 2019

तरुण भारत

# विद्यापीठाच्या ऑक्टोबर परीक्षा आजपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील ऑक्टोबरच्या (हिवाळी) परीक्षा आज (दि. १५) पासून सुरू होणार आहेत. बीए., बीएस्सी. व एमए (भाषा) विषयांच्या परीक्षेसाठी सुमारे अडीच लाख विद्यार्थी बसणार आहेत.

**१३० परीक्षा दिवाळीनंतर**

शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाच्यावतीने ऑक्टोबर परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले होते. मात्र महापुरामुळे महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली होती. परिणामी विद्यार्थांचे प्रवेश उशिरा झाले. त्यामुळे विद्यार्थांच्या मागणीनुसार एम. ए., एम. एस्सी., सामाजिक शास्त्रे, भाषा विषयाच्या १३० पेक्षा जास्त परीक्षा दिवाळीनंतर घेण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2019

Times of India

# Shivaji University's winter semester exam from today

File photo



SUK has 293 affiliated colleges across Sangli, Satara and Kolhapur districts

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: The winter semester exam at Shivaji University, Kolhapur (SUK) will commence from October 15.

The varsity's in-charge director of Board of Examinations and Evaluation, GR Palase, told **TOI** that the exam schedule is likely to be stretched further as around 130 exams from MA and MSc courses will be conducted after Diwali.

"Generally, these exams are conducted right at the beginning of the semester, however, colleges from flood-affected areas and colleges with the MSc courses which started with late admission, had requested additional time to finish the syllabus. Hence the exams schedule is likely to be stretched further," he said, adding that the exams on October 20, 21 and 22 will be conducted later due to assembly elections. From October 24 onwards, Diwali holidays will commence during which no exams would be conducted.

Palase said that they will continue to use Secured Remote Paper Delivery (SRPD), internal mark feeding software and online evaluation to draw simultaneous course-wise results.